स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ
नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY
NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड.

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

ACADEMIC (AFFILIATION) SECTION

Phone: (02462) 229300
Fax : (02462) 229574

Website: www.srtmun.ac.in

E-mail: affi.srtmun@gmail.com

**शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता महाविद्यालय,विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, तुकडी बंद करणेबाबतचे प्रस्ताव सादर करणे बाबत.**

# :: परिपत्रक ::

**संदर्भ :- या विभागाचे परिपत्रक क्र. शैक्षणिक/संलग्न-०३/२०१४-२०१५/१७७५, दि. २०.१०.२०१४.**

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील प्राचार्यांना कळविण्यात येते की, संदर्भांकित परिपत्रकान्वये महाविद्यालय, विद्याशाखा,अभ्यासक्रम, विषय, तुकडी बंद करणेबाबतची कार्यवाही महाराष्ट्र विद्यापीठे अधिनियम १९९४ कलम ९२ व ९२ (०२) मधील तरतुदीनुसार करावी असे कळविण्यात आलेले आहे.

जर एखाद्या संस्थेस/महाविद्यालयास त्यांचे महाविद्यालय,विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, तुकडी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ करीता बंद करावयाचे असेल तर त्यांनी संदर्भांकित परिपत्रकानुसार कार्यवाही करुन विद्यापीठ परिनियम S३७५ अन्वये याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठास ०१ ऑगष्ट २०१६ पूर्वी सादर करावा व प्रस्तावामध्ये महाविद्यालय,विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय, तुकडी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ या वर्षापासून बंद करावयाचे असल्याबाबतचा संस्थेचा ठराव प्रस्तावासोबत जोडावा. याबाबत विद्यापीठाचे परिनियम S३७४ ते S३८० प्रमाणे कार्यवाही विहीत केली आहे, त्याचे पालन संबंधित महाविद्यालय/संस्थेने करावयाचे आहे.

तसेच उपरोक्त बाबींचे व विहित मुदतीचे पालन न केल्यास संलग्निकरण शुल्क विद्यापीठास देय राहील, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

सदरचे परिपत्रक हे विद्यापीठाच्या www.srtmun.ac.in यां संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेले आहे.

"ज्ञानतीर्थ", परिसर, )(
विष्णूपुरी, नांदेड-४३१ ६०६. )(
जा.क्र.शैक्षणिक/संलग्न-०३/२०१५-२०१६/ 170 )(
दिनांक :- २०.०६.२०१६ )(

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ

**प्रत :-**

१. मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२. सिस्टीम एक्सपर्ट, विद्यापीठ अनुदान आयोग कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर बी.सी.यु.डी. या शिर्षकांतर्गत प्रसिध्द करावे.

सुनिल रावळे १३४/९८२६२३५८७